ePaper

फेरविचार याचिकेवरील निर्णयानंतरच मराठा समाजाचे मागासलेपण तपासणार




| वर्ष - 6 | अंक - 142 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- मेट्रो भुयारी मार्गात रूळ टाकण्याच्या कामांना वेग!
- पिंपळे सौदागरवासीयांचा 'निर्धार'!
- महाबळेश्वर तालुक्यातील २१४ कोटींच्या विकासकामांना मुख्यमंत्री शिंदे यांची मंजुरी

www.mahaenews.com | सोमवार | दिनांक 29 ऑगस्ट 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# टोलनाक्यांवर स्वतंत्र मार्गिका!

## मुख्यमंत्र्यांचे निर्देश : वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आढावा





**पुणे।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या वाहनांसाठी मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावरील टोलनाक्यांवर स्वतंत्र मार्गिका करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. खालापुर टोलनाक्याला भेट दिल्यानंतर याठिकाणी अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत त्यांनी ह्या सुचना दिल्या. सण-उत्सव, सुट्ट्यांच्या काळात या द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडी आणि पथकर नाक्यावर होणारी गर्दी टाळण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ वाढवावे. सीसीटीव्ही यंत्रणा सक्षम करण्याबरोबरच अपघात टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.**

साताऱ्याहून मुंबईकडे परतताना दुपारी पुण्यातील चांदणी चौक परिसराला भेट दिल्यानंतर त्यांनी मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावरील खोपोली खालापूर) टोलनाक्याला भेट दिली. याभागात होणाऱ्या वाहतूक कोंडीचा मुख्यमंत्र्यानी आढावा घेतला. महामार्गांवर होणाऱ्या वाहतूक कोंडीची मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी गांभीर्याने दखल घेतली. आज दुपारी त्यांनी पुण्यातील चांदणी चौक परिसराला भेट दिली. या भागात होणाऱ्या वाहतूक कोंडीसंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

> **“सीसीटीव्ही यंत्रणा सक्षम करण्याबरोबरच अपघात टाळण्यासाठी रस्ता सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्याकरिता तातडीने उपाययोजना हाती घ्याव्यात असे सांगत वाहतूक कोंडीतून प्रवाशांना दिलासा देण्यासाठी यंत्रणेने जलदगतीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.”**
> **- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री.**

मुंबई- पुणे द्रुतगती महामार्गावरील खोपोली (खालापूर) टोलनाक्यालाही मुख्यमंत्र्यांनी भेट दिली.

याभागात होणाऱ्या वाहतूक कोंडीचा त्यांनी आढावा घेतला. गणेशोत्सव, शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुटीच्या काळात याठिकाणी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी टोल नाक्यांवर ट्रॅफिक वॉर्डन त्याचबरोबर टोल वसूल करण्यासाठी आवश्यक ते स्कॅनिंग मशिन्सची संख्या वाढवावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी महामार्ग पोलिस आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीत दिले.

# श्याम ग्लोबल टेक्नोची पुण्यात नवीन उत्पादन प्लॉंट

## नरेंद्र गोयल यांची माहिती : महिंद्रा ॲण्ड महिंद्राची मूळ उपकरण उत्पादक कंपनी

**पुणे।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

श्याम ग्लोबल टेक्नो व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड (एसजीटीपीएल) ही महिंद्रा ॲण्ड महिंद्रा लिमिटेडची मूळ उपकरण उत्पादक (ओईएम) आहे. कंपनीने अलीकडेच पुण्यात नवीन उत्पादन सुविधा सुरू करून आपल्या कार्याचा विस्तार केला आहे. श्याम ग्लोबल टेक्नो व्हेंचर्स प्रा. लिमिटेडचा प्लांट आणि मुख्यालय पुणे येथे आणि



ब्रांच ऑफिस मुंबई येथे आहे.

एसजीटीपीएलने जागतिक दर्जाच्या जेन सेट्सचे उत्पादन करणारा अत्याधुनिक प्लांट तयार केला आहे. जेथे उच्च उत्पादकतेसाठी उत्तम इंधन व्यवस्था, एक्झॉस्ट एमिशन्स आवश्यक असते, एसजीटीपीएलकडे ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणारे आणि स्पेक्ट्रम उद्योगातील मोठ्या गरजा पूर्ण करणारे जेन सेट आहेत. ही कंपनी दीर्घकाळ चालणारे आणि कमी देखभालीसह उच्च दर्जाचे,लो मेंटनन्स जनरेटर तयार करते. महिंद्रा पॉवरॉलचा वापर बांधकाम क्षेत्रात, हॉस्पिटल, इंडस्ट्री, स्कूल, पेट्रोल पंप, टेलिकॉम, क्रशिंग उद्योगात केला जातो.या नवीन उत्पादन सुविधेचे उद्घाटन हेमंत सिक्का (अध्यक्ष, एफईएस, पॉवरॉल बिझनेस महिंद्रा अँड महिंद्रा) यांनी केले. संजय जैन (बिझनेस हेड, पॉवरोल) नरेंद्र गोयल (संचालक, श्याम ग्लोबल टेक्नोव्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड) आणि महिंद्राचे इतर प्रतिनिधी देखील यावेळी उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्वांना संबोधित करताना नरेंद्र गोयल म्हणाले, श्याम ग्लोबल गेल्या 4 वर्षांपासून ग्राहकांच्या हितासाठी काम करत आहे. पुण्यातील आमच्या विस्तारानंतर आम्ही पुढे देखील आणखी विस्तार करू. माला विश्वास आहे की भविष्यात जेनसेटची मागणी वाढेल जी नागरिक आणि व्यवसाय दोघांसाठीही फायद्याची ठरेल.

# मेट्रो भुयारी मार्गात रूळ टाकण्याच्या कामांना वेग!

## लवकरच प्रत्यक्ष चाचणी होणार

**पुणे ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

शिवाजीनगर ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गिकेअंतर्गत विविध कामांनी वेग घेतला असून भुयारी मार्गात रूळ टाकण्याचे तसेच विद्युत तारा आणि सिग्नल यंत्रणा बसविण्याची कामे सुरू करण्यात आली आहेत. मेट्रो सुरू होण्यासाठी आवश्यक असलेल्या या कामांनी गती घेतल्याने येत्या काही दिवसांत भुयारी मेट्रोची प्रत्यक्ष चाचणी होणार आहे. मेट्रो प्रकल्पाच्या पिंपरी-चिंचवड महापालिका ते स्वारगेट या मेट्रो मार्गाची कामे प्रगतीपथावर आहेत. ही मार्गिका शिवाजीनगर स्थानकापर्यंत उन्नत असून तेथून स्वारगेट पर्यंतची मार्गिका भुयारी आहे. एकूण सहा किलोमीटर लांबीच्या भुयारी मार्गाता शिवाजीनगर, जिल्हा सत्र न्यायालय,



बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट अशी पाच स्थानके आहेत. भुयारी मेट्रो मार्गिकेसाठी दोन्ही बाजूने प्रत्येकी सहा-सहा किलोमीटर लांबीच्या बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता रूळ टाकणे, विद्युत तारा बसविणे, सिग्नल यंत्रणा उभारणे अशी कामे सुरू झाली आहेत.



# पुणे : समाविष्ट गावांतील कचरा संकलनासाठी नवा प्रकल्प

## 'स्वच्छ' संस्थेची कचरा संकलन व्यवस्था निर्माण करण्यासाठी नवा प्रकल्प सुरु

**पुणे ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

आंतरराष्ट्रीय कामगार संस्था, पुणे महापालिका आणि स्वच्छ संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विकेंद्रीत बायोमिथेन प्रकल्प सुरू करण्यात येईल. या प्रकल्पाद्वारे असंघटित क्षेत्रातील कचरा वेचकांसाठी पुर्नप्रक्रिया क्षेत्रातील रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे. या प्रकल्पासंदर्भात जैववैद्यकीय, प्लास्टिक आणि रासायनिक कचरा क्षेत्रावर आधारीत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय कामगार संस्थेने आयोजित केलेल्या या कार्यशाळेत कामगार संस्थांचे महत्त्व, सामाजिक आणि आर्थिक कार्य, कचरा क्षेत्रातील संधी आणि आव्हाने तसेच कायदेशीर बाबींबाबत चर्चा करण्यात आली. सुरक्षित आणि सोप्या पद्धतीने कचरा व्यवस्थापन कसे करावे याबाबत गटचर्चा करण्यात आली. त्याबाबतचे सादरीकरणही करण्यात आले. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन कचरा संकलन ते वाहतूक अशा दैनंदिन कामाचे आंतरराष्ट्रीय व्यवसाय विषयक आरोग्य आणि सुरक्षा दृष्टीकोनातून निरीक्षण करण्यात आले. कचरा संकलन करताना पुरेशी साधने आणि उपकरणे मिळत नाहीत.

# विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल चाकणच्या विद्यार्थ्यांचा स्कूल स्टुडन्ट कौन्सिलचा शपथग्रहण समारंभ उत्साहात!

## पदग्रहण समारंभास विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती

**चाकण ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

श्री एस पी देशमुख शिक्षण संस्थेच्या विद्या व्हॅली इंटरनॅशनल स्कूल चाकण या प्रशालेमध्ये कोविड नंतरच्या दोन वर्षानंतर विद्यार्थी मध्ये निवडणूक व मतदान प्रक्रिया माहिती होण्यासाठी व शालेय कामकाजामध्ये विद्यार्थी सहभाग उत्स्फूर्तपणे होण्यासाठी स्कूल कौन्सिल तयार करण्यात येणार होते. त्यानुसार वेगवेगळ्या पदांसाठी निवडणूक घेण्यात आली. यामध्ये प्रशालेतील इयत्ता पाचवी ते दहावी मधील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. ही सर्व प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेप्रमाणे घेण्यात आली यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया व्यवस्थित समजण्यास मदत झाली. निवडणूक घेत असताना सर्व महत्त्वाचे सूचना विद्यार्थ्यांना दिल्या व शिस्तबद्ध पद्धतीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यानंतर विद्यालयातील शिक्षकांनी मतपेटीमध्ये टाकण्यात आलेल्या सर्व बॅलेट पेपर मोजणी केल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना सर्वात जास्त मतदान मिळाले. त्या सर्व विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या पदांची जबाबदारी देऊन त्यांच्या मार्फत शालेय कामकाज सुस्थितीमध्ये व नियोजित करण्यामध्ये सहभाग दर्शविला. यानंतर या सर्व विद्यार्थ्यांचा पदग्रहण समारंभ उत्साहात पार पडला. या शपथ ग्रहण समारंभादिनी सर्व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते यामध्ये मा.श्री. भूपेश चावला, डी

**नवनिर्वाचित स्टुडन्ट स्कूल कौन्सिल**
**हेड बॉय - मोक्ष पगार**
**हेड गर्ल - वैष्णवी नाईकवाडी**
**स्कूल कॅप्टन - कृष्णा सोळंकी**
**स्कूल वाईस कॅप्टन - पार्थ पडालिया**
**स्पोर्ट कॅप्टन - ऋषभ जैन**

.जे. एम. डिपार्टमेंट ऑफ बॉडी शॉप स्कोडा वॅग्नर, मा. श्री. सतीश जगधने, हेड ऑफ सप्लाय अँड ऑपरेशन इन फॉरबेस मार्शल आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

विद्यालयाने सदर कार्यक्रमाचे उत्तम नियोजन करून कार्यक्रमांमध्ये अनेक विविध कलाछटांचे वापर करून कार्यक्रम उत्साह साजरा केला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांना पायलटीग करत ड्रम व ड्रिलच्या जोशपूर्ण वादनामध्ये स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यालयाचा ध्वजारोहण करण्यात आला. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्यामध्ये असणाऱ्या सुप्त व कलागुणांना सर्व पाहुण्यांसमोर सादरीकरण केले यामध्ये समूहगीत, नृत्य, भाषण इ. समावेश होता. सर्व विद्यार्थ्यांनी सुंदर संचलन व कवायतीचे शिस्तबद्ध रीतीने सादरीकरण केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सॅसेश व बॅचेस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच विद्यालयाच्या प्राचार्य सस्वाती रणदिवे यांच्या हस्ते त्यांना शपथ व जबाबदारीची जाण करून देण्यात आली. तसेच स्वयंम शिस्त,स्वप्रतिबिंब व स्वतः ची जागरूकता याबद्दल माहिती दिली.




संस्थेचे अध्यक्ष शामरावजी देशमुख यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व त्यांनी वेळात वेळ काढून विद्यालयातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव व शपथ ग्रहण समारंभास उपस्थिती दर्शविल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. तसेच विद्यार्थीच्या जडणघडणीत संस्थेमार्फत जे शक्य होईल त्या सर्व गोष्टी सर्वतोपरी दिल्या जातील याची ग्वाही दिली व विद्यार्थी व शिक्षकांचे त्यांनी केलेल्या कार्याबद्दल विशेष कौतुक केले. सदर कार्यक्रमास संस्थेच्या सचिव सौ. रोहिणी ताई देशमुख, उपाध्यक्ष श्री.अक्षयराज देशमुख, संचालिका सौ.हर्षल देशमुख, विद्याव्हॅली स्कूलच्या प्राचार्या सौ. स्वाती रणदिवे, विद्यानिकेतन चे श्री. दिपक शिंदे व समस्त पालक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयातील शिक्षक श्री सायन दास गुप्ता सर यांनी केले. कार्यक्रमाची प्रस्तावना व मान्यवरांची ओळख सौ. सुजाता ढेरंगे आणि सौ सीता नाईकवाडी यांनी केली.

# पिंपळे सौदागरवासीयांचा 'निर्धार'!

## इको फ्रेंडली गणेशोत्सवाचा संकल्प : उन्नती सोशल फाउंडेशनचा विधायक पुढाकार



**पिंपरी। ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

स्वयंसेवी संस्थांनी एखादी समाजाच्या हिताची कल्पना मांडली, तिला जागरूक लोकांनी प्रतिसाद दिला आणि ती जोपासली तर किती व्यापक क्रांती होऊ शकते, याचे समर्पक उदाहरण आहे उन्नती सोशल फाउंडेशन आणि तिचा गणपती महोत्सव २०२२ अंतगर्त 'इको फ्रेंडली गणेशोत्सव'! निसर्गावर कोणताही ओरखडा येऊ नये यासाठी परिसरातील बालचमूंसह थोरा मोठयांना शाडूच्या मातीपासून गणेश मूर्ती कशा बनवायच्या याची मोफत कार्यशाळा यंदाही पिंपळे सौदागर परिसरात उत्साहात पार पडली. परिसरातील जवळपास हजार नागरिकांनी या मोफत कार्यशाळेचा लाभ घेतला.

सुरुवातीला दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास उन्नती सोशल फाऊंडेशन तथा भारतीय जनता पार्टी चिंचवड विधानसभा महिला मोर्चाच्या अध्यक्षा कुंदाताई भिसे, उद्योजक संजय भिसे, प्रमुख पाहुणे आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

का र्यशाळेत भगवान भोसले, दिपाली देशमुख व सुधीर लांडगे या कला प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक गणपती कसे बनवायचे? याचे प्रात्यक्षिक दाखवून मुलांकडून पर्यावरणपूरक गणेशमुर्त्या बनवून घेतल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून गणेश मूर्ती बनविण्याचा आनंद लुटला. त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी कला शिक्षकांनी अतोनात परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उत्कृष्ट गणपती बनविलेल्या मुलांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देण्यात आले व सर्व उपस्थित मुलांचे कौतुक केले.

> **“ लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवाचे स्वरूप, त्याचा आयाम आता पूर्णपणे बदलतो आहे. गणपती बनवताना पर्यावरणाचा समतोल राखणे गरजेचे आहे. नद्या या आपल्या जीवनदात्या म्हणून ओळखल्या जातात. मात्र, विघ्नहर्त्यांच्या प्लास्टरच्या मूर्तीमुळे जलप्रदूषण होऊन पर्यावरणाची अपरिमित हानी होत आहे. पर्यावरणाचा समतोल कसा राखावा यासाठी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती नदीपात्रात, विहिरीत विसर्जित करून ते पाणीसाठे दूषित करण्याऐवजी शाडूच्या गणेशमूर्ती पुजून नंतर त्या कृत्रिम जलकुंडात विसर्जित करणं ही काळाची गरज आहे. त्यासाठी शाडू मातीच्याच मूर्ती बनविण्याला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.**
>
> **- कुंद्रा भिसे**, अध्यक्षा, उन्नती सोशल फाउंडेशन.

# पुणे ते शिवनेरी २७५ सायकलपटूंची 'वारी'

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : इंडो ॲथलेटिक्स सोसायटीचा उपक्रम

**पिंपरी। ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

निगडी येथील इंडो ॲथलेटिक्स सोसायटीतर्फे दरवर्षी पुणे ते शिवनेरी असे २०० किमीच्या राईडचे आयोजन केले जाते. यावर्षी देखील स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त २७५ सायकलस्वरांनी यामध्ये सहभाग घेतला.सदर वर्ष पुणे ते शिवनेरी या राईडचे तिसरे वर्ष आहे, आणि दरवर्षी याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत आहे. पर्यावरण आणि आरोग्य या दोन्हींचा संदेश समाजामध्ये देत सदर सायकल स्वारी मार्गक्रमन करते. एका दिवसामध्ये तब्बल १०० किलोमीटरचे अंतर पाच ते सहा तासांमध्ये पार केले जाते.

२७ ऑगस्ट रोजी नाशिक फाटा येथून सकाळी सहा वाजता उद्योजक अन्नारे बिरादार, एमआयडीसीचे अधिकारी प्रकाश शेडबाळे त्याचप्रमाणे आयएएसचे गजानन खैरे, अजित पाटील, गणेश भुजबळ यांच्यातर्फे झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली. राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरु सायकल क्लब, मंचर येथे साई प्रिंटर्स तर्फे अल्पोपहार आयोजन, नारायणगाव येथे साई संस्थान व शिवनेरी ॲथलेटिक असोसिएशन तर्फे स्वागत करण्यात आले. श्रीराज हॉटेल तर्फे सर्वांना मसाला दूध वाटप करण्यात आले.

पुणे ते शिवनेरी सायकल मार्ग – नाशिक फाटा – राजगुरुनगर – मंचर – नारायणगाव – शिवनेरी असा होता .अष्टविनायक मधील लेण्याद्री करून सर्व सायकलिस्ट ओझर येथे मुक्कामसाठी गेले आणि दुसऱ्या दिवशी याच मार्गावरून परतीचा प्रवास संपन्न झाला असे आयएएस शिवनेरी सायकल राईडचे प्रमुख श्रेयस पाटील आणि अजित गोरे यांनी सांगितले. फेरी यशस्वी करण्यासाठी कैलास तापकीर, गिरीराज उमरीकर, कपिल पाटील, अमित पवार, रमेश माने, कॅड कॅफे कॉर्नरचे संचालक



भावेश वाघ, सुशील मोरे, श्रीकांत चौधरी, प्रतीक पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संपादकीय »

# जगणे परीक्षा नव्हे संधी !

***जगात पहिला मानव 26 लाख वर्षापूर्वी जन्मल्याचे आजचे विज्ञान सांगते.त्यानंतर लाखो वर्ष आपली रानटी अवस्था होती. माणूस पदावर यायला आपल्याला लाखो वर्षाचा काळ लागला.या दरम्यानच्या प्रचंड मोठ्या कालखंडात खरंतर कोणताच धर्म जगात नव्हता.***

आज जे काही धर्म जगभर आपल्याला दिसतात त्यांचे वय त्यामानाने फारच कमी म्हणजे अडीच तीन हजार वर्षाचे असल्याचे आजचे संशोधन सांगते.त्यातला सगळ्यात तरुण धर्म आहे इस्लाम.त्याचे वय अवघे 1450 वर्ष आहे. इस्लाम धर्मात माणसाच्या जगण्याचा सगळा डोलारा उभा आहे मरणावर ,खरे जीवन मेल्यावर सुरू होईल.सध्या जे काही सुरू आहे ती माणसाची फक्त परीक्षा सुरू आहे असे इस्लाम मानतो. कमी अधिक प्रमाणात अश्याच कल्पना सगळ्या धर्मात दिसतात.धर्मांच्या बंधनात करकचून जो अनुयायी बांधला जातो त्याला वर्तमान काळाचे कोणतेही आकर्षण राहत नाही. आता जगायचे कशासाठी तर थेट जन्नत मध्ये जागा मिळावी म्हणून असे मुस्लिम मानतो.हिंदू धर्मात सुद्धा मोक्षाची कल्पना आली आहे. या जन्मात चांगली कामे,पुण्य कशासाठी करायचे कारण पुढचा जन्म चांगला मिळावा म्हणून,थेट स्वर्गात प्रवेश मिळावा नरकातील यातना आपल्या वाट्याला येऊ नयेत यासाठी काय करायला हवे हे सांगणारे असंख्य धार्मिक ग्रंथ हिंदू धर्मात आहेत.ख्रिश्चन धर्मातही स्वर्ग,नरक कल्पना आहेच.धार्मिक व्यक्तीची सगळी धडपड स्वर्गात आरक्षण कसे विनासायास होईल यासाठी असल्याचे दिसते. काल्पनिक मांडणीवर विश्वास ठेवून जगणाऱ्या लोकांची संख्या जगाच्या पाठीवर कमी नाही.खरे आयुष्य तर मेल्यानंतर सुरू होते असे आज कुणी म्हटले तर त्याला आपण वेड्यात काढू परंतु असे मानणारे अब्जावधी लोक जगात आहेत हे लक्षात घ्या.आजच्या घडीला जगात 52 मुस्लिम राष्ट्रे आहेत आणि त्यातील दीड दोन अब्ज लोक खरे आयुष्य तर मेल्यावर सुरू होते असे मानणारे आहेत कारण ही वचने त्यांच्या धर्मग्रंथात लिहिली आहेत.हिंदू,मुस्लिम,ख्रिश्चन, यहुदी या मोठ्या धर्माची मांडणी स्वर्ग,नरक बाबतीत सारखी असल्याचे जाणवते.त्यातील मुस्लिम मात्र वर्तमान काळाचे जगणे म्हणजे काहीतरी चालढकल मानतात. आजच्या प्रगत विज्ञानाच्या अनुषंगाने विचार केला तर व्यक्तीचा जन्म हा अपघात असून मृत्यू हे सर्वात मोठे सत्य आणि नियमित प्रक्रियेचा भाग आहे.



## आनंदी सकाळ

# नको चिंता शोधा हित...

सजीवांत, म्हणजे प्राणिमात्रांत किंवा फळाफुलांत चैतन्य आहे. ते आपल्याला दिसते किंवा भासते. ज्या गोष्टी जड आहेत, उदा. लाकूड, कागद, लोखंड इत्यादींतही हे चैतन्य असतेच. ते जोपर्यंत त्यात असते, तोपर्यंत त्याचे अणू एकमेकांशी घट्टपणे बांधलेले असतात. ते त्यातून निघून जाते, तेव्हा त्याचे सूक्ष्म कण एकमेकांपासून विलग होऊन मातीमोल होतात. चैतन्य निघून गेले, की माणसाचा देहदेखील मातीमोलच होतो.

चैतन्य साऱ्या सजीवांत व निर्जीवांत असतेच. आपली जाणीव तेवढी सूक्ष्म नसल्यामुळे ते कळत नाही. गाय गवत खाते. गवत हे स्थूल-जड आहे. त्याचे रवंथ करून त्यापासून गायीच्या शरीरात दूध बनते. हे दूध गवताच्या मानाने विरल द्रव असते. ते प्राशन केल्यानंतर माणसाच्या शरीरात जे बल निर्माण होते, जी शक्ती निर्माण होते ती निर्गुण असते. अशा प्रकारे जडातून सूक्ष्माकडे जाण्याचा मार्ग असतो. तो निसर्गनिर्मितच असतो. फक्त तो नीट समजून, त्याप्रमाणे आचरण करून, आपल्याला त्याचा उपयोग सगुणातून निर्गुणाकडे जाण्यासाठी

# “गुरू तेथे ज्ञान, ज्ञानी आत्मदर्शन, दर्शनी समाधान आथी जैसे ।।”








आजच्या दिवशी म्हणजे आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. ज्यांनी महाभारत, पुराणे लिहिली त्या व्यासमुनींना वंदन करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा हा मंगलदिन आहे. व्यासपौर्णिमेच्या दिवशी ‘ओम नमोस्तुते व्यास, विशाल बुद्धे’ अशी प्रार्थना करून, त्यांना प्रथम वंदन करण्याचा प्रघात आहे, परंपरा आहे. आपल्या देशात रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. आपण कोणाचे तरी शिष्य आहोत, या भावनेत एक कृतज्ञता वाटते. आज गुरुपौर्णिमा. तसं बघायला गेलं तर हा काही सण नाही पण या दिवसाचं एक वेगळं महत्व आपल्या संस्कृती मध्ये आहे. गुरू ही संकल्पना आपल्या संस्कृतीमध्ये खूपच उच्च दर्जाची आहे. गुरुचं महत्व हे देवापेक्षा यत्किंचितही कमी नाही. वेदांमध्ये गुरूचा उल्लेख हा साक्षात परब्रम्ह म्हणून केला गेला आहे.

गुरुची परंपरा सुरू राहण्यासाठी आवश्यक असतो तो शिष्य. हा शिष्य ही परंपरा फक्त पुढे नेत नाही तर ती अधिकाधिक समृद्ध करत जातो. जसे की एकलव्याने शिष्याच्या परंपरेत एक अनोखं उदाहरण प्रस्थपित केलं. प्रत्यक्ष द्रोणाचार्यांच्या हातून दिक्षा त्याला मिळाली नव्हती पण तरीदेखील त्यांनाच गुरू मानून त्याने जे कौशल्य विकसित केलं त्याला बघून द्रोणाचार्य देखील अचंबित झाले होते. इतिहासातील हे एकमेव उदाहरण. भगवान श्रीकृष्णांनी गुरूच्या घरी लाकडे वाहिली. संत ज्ञानेश्वरांनी वडीलबंधू निवृत्तीनाथ यांनाच आपले गुरु मानले, तर संत नामदेव साक्षात विठ्ठलाशी भाष्य करीत असत. त्या नामदेवांचे गुरु होते विसोबा खेचर. भारतीय संस्कृतीत गुरूला नेहमीच पूजनीय मानले आहे. आपल्या देशाचे वैशिष्ट्य म्हणजे गुरु-शिष्य परंपरा. गुरुच आपणाला अज्ञानातून बाहेर काढतात. शिक्षक हे आपले गुरुच आहेत. प्रथम आपण ‘गुरु’ या शब्दाचा अर्थसमजून घेऊया. त्या दिशेने प्रयत्न होणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते. सोन्यावरील आयात शुल्कात सरकारने एक जुलैपासून वाढ केली आहे; ती आता ७.५ टक्क्यांवरून १२.५ टक्क्यांवर गेली आहे. त्यामुळेही रुपया सावरेल असा कयास बांधण्यात आला होता. अशा विविध उपायांद्वारे रुपया सावरत असताना महागाईलाही अटकाव घालण्याचे आव्हान सरकारसमोर आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलात होत असलेली घट ही यासाठी चांगली बातमी म्हणावी लागेल.

# नोटा फिट, आपण नीट !

रिझर्व्ह बँकेने नोटांची प्रकृती तपासण्याचा निर्णय घेतलाय म्हणे! या नोटा फिट असतील, तरच बँका त्या स्वीकारणार, असंही रिझर्व्ह बँक म्हणे!

याचा अर्थ आपली प्रकृती नोटांच्या प्रकृतीवर अवलंबून आहे म्हणे ! म्हणजे त्यात नवं काहीच नाही म्हणा... खिशात खुळखुळणारा खुर्दा आणि ताठ कणा यांचं काही एक नातं असतं, हे मान्य व्हावं. सद्यस्थितीत आरोग्याला काही झाल्यास इलाज करण्याची ताकदही भक्कम खिशातच असते; अन्यथा परिस्थिती बिकट. अर्थात, या साऱ्यात काहीच नवं नाही म्हणा. मनुष्यप्राणी वस्तुविनिमयाने व्यवहार करीत होता, तेव्हापासूनच 'इस हाथ दो, उस हाथ लो' हा नियम लागू आहे. ही अशी परिस्थिती असल्यामुळेच जमतील तिथं, जमतील त्या वेळी, जमेल त्या मार्गानं पैसे कमावून जपून, दडवून ठेवले जातात. धान्याचे डबे हा बँकेचा आद्य अवतार मानला, तर तेव्हापासूनच्या इतिहासाचा विचार करावा लागेल. तो अभ्यास नंतर करू. सध्या त्या धान्याच्या डब्याच्या, पाकिटातील चोर कप्प्याचा, कपाटातल्या लॉकरमधल्या आतल्या कप्प्याचा आणि अशा विविध ठिकाणचा विचार करू. 'असू दे थोडी कॅश हाताशी,'



असं म्हणत जपून ठेवलेल्या नोटांच्या आरोग्याचा आणि पर्यायानं त्या नोटा ठेवणाऱ्यांच्या आरोग्याचा मुद्दा रिझर्व्ह बँकेच्या या नव्या नियमामुळं ऐरणीवर आला आहे. या साऱ्या जपून ठेवलेल्या नोटांचं आरोग्य तपासायचं, तर त्या बाहेर काढाव्या लागणार. तशा त्या बाहेर काढल्या, की आपल्या उजव्या किंवा डाव्या अंगाला त्याचा पत्ता लागणार. ते तेव्हाचं तेव्हा पाहून घेता येईलही; परंतु त्यानंतर नवी जागाही शोधावी लागणार. एक तर हाती पगार पडण्यापूर्वी त्यावरचा कर द्यायचा. त्यानंतर घरखर्च, भविष्याच्या दृष्टीनं बचत, कोव्हिडच्या काळात शेअर मार्केटनं घातलेली भूल, इंट्रा डे नावाच्या मायाजालात हरवलेली बऱ्या प्रमाणातली रक्कम या साऱ्यानंतर अनेकांच्या जिवाला या दडवलेल्या (दडपलेल्या नव्हे, त्यांचे प्रश्न आणखी वेगळे) नोटांचा आधार. आता तोही दुरावतो की काय, अशी शक्यता निर्माण झाली आहे. रिझर्व्ह बँक आणि सरकारनं याविषयी काही तरी करायला हवं. अर्थात, हे सारं असं आपल्याला वाटून उपयोग नाही. यावर कोणी आवाज उठवणार नाही आणि उठवला, तरी तो क्षीण आवाज सरकारपर्यंत पोहोचण्याची शक्यता नाही. या नोटांचं आरोग्य तपासताना त्या दडवलेल्या आहेत, की दडपलेल्या हे समजण्याची काही पद्धत असणार आहे का? काळं धन बाहेर काढण्यासाठी एकदा नोटा बदलून झाल्या आहेत. या नोटांचं आरोग्य तपासल्यानंतर त्यामध्ये ती तेव्हा प्रसिद्ध आणि चर्चेचा विषय झालेली चिप असणार आहे का? दडपलेलं, अर्थात काळं धन असेल, तर आरोग्याच्या तपासणीत तसा निष्कर्ष येणार आहे का? टेबलाखालून आलेल्या नोटा शोधण्यासाठी काही वेगळी छाननी असणार आहे का?

## ।। अभंगवाणी ।।



न बोलतां तुम्हां कळों न ये गुज ।
म्हणउनी लाज सांडियेली ॥१॥
आतां तुम्हां पुढें जोडीतसें हात ।
नका कोणी अंत पाहों माझा ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाबळेश्वर तालुक्यातील 214 कोटींच्या विकासकामांना मुख्यमंत्री शिंदे यांची मंजुरी!

## दुसऱ्याच भेटीत जिल्ह्यातील अनेक प्रलंबित प्रश्नांना मुख्यमंत्र्यांनी दिली गती

**सातारा ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महाबळेश्वर येथे जगभरातून पर्यटक येत असतात या पर्यटकांना उच्च दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यासाठी व पर्यटन विकास स्थळांचा विकास करण्यासाठी 214 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. सातारा जिल्ह्याचे सुपुत्र असलेले शिंदे मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर त्यांनी आपल्या दुसऱ्याच भेटीत जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन केले होते.**

महाबळेश्वर येथील राजभवनातील दरबार हॉलमध्ये पार पडलेल्या या आढावा बैठकीत मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा घेतला. या बैठकीसाठी जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.



या बैठकीत जिल्ह्याच्या विकासाचे अनेक प्रस्ताव मंत्रालयस्तरावर प्रलंबित असल्याचे त्यांच्या निर्दशनास आले. या प्रस्तावांची एकत्रित यादी करुन द्यावी, हे प्रस्ताव संबंधित विभागाचे मंत्री व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन तात्काळ मार्गी लावले जातील असे त्यांनी स्पष्ट केले. त्यासोबतच जिल्ह्यातील विकासकामे पूर्ण करण्यासाठी प्राप्त झालेल्या निधीतून दर्जेदार कामे करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

सातारा जिल्ह्यातील दळणवळण सोयीचे होण्यासाठी रस्त्यांचे जाळे उभे करा, अशी सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला केली. तसेच महाबळेश्वर येथील वाहन पार्किंग व्यवस्थेचा कायमस्वरुपी प्रश्न मिटावा, यासाठी एसटी डेपो आणि रे गार्डन येथे वाहनतळ उभारण्यासाठी निधी दिला जाईल असेही स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात, यासाठी जिल्हा नियोजनच्या निधीतून 17 प्राथमिक आरोग्य केंद्रे स्मार्ट करावीत असेही त्यांनी सुचवले. महाबळेश्वरसोबतच लगतच्या परिसरातही पर्यटन वाढीसाठी मोठी संधी असून त्यासाठीही प्रयत्न करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. महाबळेश्वर सोबतच जिल्ह्यात इतर ठिकाणी पर्यटनस्थळांचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळासाठी विभागीय अधिकारी दर्जाचे पद साताऱ्यात निर्माण करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यातील उद्योग वाढीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठीही विभागीय अधिकारी दर्जाचे पद निर्माण करण्यात येईल असेही स्पष्ट केले.

पुस्तकाचं गाव भिलार हे ‘क’ दर्जाचे पर्यटनस्थळ आहे. मात्र त्याचा दर्जा बदलून ते ‘ब’ दर्जाचे पर्यटनस्थळ करण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. उन्हाळ्यामध्ये तापोळा परिसरातील गावांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते. अशा ठिकाणी नागरिकांना पिण्याचे पाणी कसे मिळेल याचेही सर्वेक्षण करण्यात यावे. प्रतापगड संवर्धनाचा प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करावा, त्यासाठी नक्की निधी दिला जाईल असेही त्याने नमूद केले.

सुरुर वाई ते पोलादपूर हा नवीन राष्ट्रीय महामार्ग होण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य, रस्ते विकास, रोजगार सुविधांसह जिल्ह्याच्या सर्वांगिण विकास करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्यसंख्या बदलण्यास तूर्त स्थगिती

### शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्णयाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

**। मुंबई । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

राज्यात सत्तांतरांनंतर मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यसंख्या कमी करण्याच्या किंवा बदलण्याच्या शिंदे-फडणवीस सरकारच्या ३ ऑगस्टच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून हा निर्णय घटनाबाह्य ठरवण्याची मागणी केली आहे. न्यायालयाने ही याचिका विशेष खंडपीठासमोर वर्ग करण्याचे आदेश देताना या अध्यादेशाशी संबंधित कार्यवाही पाच आठवडे ‘जैसे थे’ ठेवण्याचे आदेश दिले आहेत.



स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यसंख्या कमी करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला अनेक पक्षांच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे येथील नेते सचिन घोटकले यांनी अभय अंतुरकर यांच्यामार्फत या निर्णयाला स्वतंत्र याचिकेद्वारे आव्हान दिले आहे. निवृत्त सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर नुकत्याच झालेल्या सुनावणीवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारने ३ ऑगस्ट रोजी काढलेल्या अध्यादेशाला आव्हान देणारी याचिका दाखल करण्यात आल्याची मात्र ती सुनावणीसाठी सूचिबद्ध नसल्याचे सांगण्यात आले. त्यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणाशी संबंधित याचिकांबरोबर ही याचिका पाच आठवड्यांनी विशेष खंडपीठासमोर सुनावणीसाठी ठेवण्याचे आणि तोपर्यंत परिस्थिती ‘जैसे थे’ ठेवण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.

## यंदा दसरा मेळावा शिवसेनेचा नसून शिंदे गटाचाच होणार?

### शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्केंचं मोठं विधान



**। मुंबई । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात जोरदार चर्चा सुरू आहे ती दसरा मेळाव्याची. दरवर्षी ही चर्चा ‘शिवसेनेचा दसरा मेळावा’ अशी सुरू असते. यंदा मात्र ती चर्चा ‘नेमका कुणाचा दसरा मेळावा?’ अशा सुरू आहे. त्याला कारण ठरली ती एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या ४० आमदारांनी आणि १२ खासदारांनी केलेली बंडखोरी. सध्या राज्याचे मुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीमुळे उद्धव ठाकरे सरकार पडलं आणि भाजपाच्या पाठिंब्यावर एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र, यानंतर शिंदे गटानं जसा मूळ शिवसेना आमचीच आणि शिवसेनेचं निवडणूक चिन्ह असलेला धनुष्यबाण आमचाच अशी भूमिका मांडली, तसा आता दसरा मेळाव्यावरही शिंदे गटानं हक्क सांगितला असून त्यासंदर्भात शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के यांनी मोठं विधान केलं आहे.

शिवसेनेचे दोन तृतियांशहून जास्त लोकप्रतिनिधी शिंदे गटात असल्यामुळे शिंदे गट हीच खरी शिवसेना असल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे परिणामी शिवसेनेचं निवडणूक चिन्ह असलेल्या धनुष्यबाणावर देखील शिंदे गटाचा हक्क असल्याचं सांगितलं जात आहे.

### आदित्य ठाकरेंनी केली होती टीका

**दोनच दिवसांपूर्वी शिवसेनेचे आमदार आणि उद्धव ठाकरेंचे पुत्र आदित्य ठाकरे यांनी “दसरा मेळावा शिवसेनेचाच होता आणि शिवसेनेचाच राहील” अशी ठाम भूमिका मांडली होती. मात्र, अद्याप प्रशासनाने दसरा मेळाव्यासाठी परवानगी दिली नसून हे गद्दार राजकारण करत असल्याची टीका त्यांनी सरकारवर केली होती. मात्र, त्यानंतर आता शिंदे गटाचे नरेश म्हस्के यांनी एक मोठं विधान केलं आहे. दसरा मेळाव्यावरून राजकारण तापलं; “अजून परवानगी मिळाली नाही पण शिवतीर्थावर..”, आदित्य ठाकरेंची संतप्त प्रतिक्रिया!**

### “त्यांना दसरा मेळावा करण्याचा काय अधिकार?”

**“जे कुणी या दसरा मेळाव्यावर अधिकार सांगत आहेत, त्यांनी हिंदुत्ववादी विचारसरणीचे विचार सोडले आहेत. त्यामुळे त्यांना आता कोणता अधिकार आहे तो मेळावा करण्याचा?” असा सवाल नरेश म्हस्केंनी शिवसेनेला विचारला आहे.**

### “कळेल तुम्हाला, मुख्यमंत्री निर्णय घेतील”

**“दसरा मेळावा घ्यायचा अधिकार आमचा आहे. आम्ही हिंदुत्ववादी विचारसरणीचे असल्यामुळे तो अधिकार आमचा आहे. कारण हा मेळावाच हिंदुत्ववादी विचारसरणीचा आहे. कळेल तुम्हाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे निर्णय घेतील”, असं सूचक विधान नरेश म्हस्के यांनी केलं आहे.**

## “राष्ट्रवादीमध्ये एक बोलबच्चन होते मियाँ....”, मोहीत कंबोज यांचं खोचक ट्वीट, रोहित पवारांना केलं लक्ष्य!



सातारा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

गेल्या काही दिवसांपासून भाजपा नेते मोहीत कंबोज हे चर्चेत आले आहेत. महाविकास आघाडीतील नेतेमंडळींवर मोहीत कंबोत सात्याने टीका करत असताना आता त्यांनी आपला मोर्चा राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या दिशेने वळवला आहे. मोहीत कंबोज यांनी त्यांच्या ट्विटर अकाऊंटवरून रोहित पवार यांना लक्ष्य करत रविवारी सकाळी तीन ट्रीट केले आहेत. पीएमसी बँक घोटाळाप्रकरणी त्यांनी रोहित पवार यांचं नाव घेतलं असून राष्ट्रवादीच्या इतर दोन अटकेत असलेल्या नेत्यांवरूनदेखील खोचक टोला लगावला आहे.

घोटाळे समोर आल्यानंतर भाजपाला दोष दिला जातोय, असं कंबोज ट्वीटमध्ये म्हणाले आहेत. “स्वत: सगळे घोटाळे करून आता ते समोर आल्यावर भाजपाला दोष देण्याचा हा एक नवीन धंदा आहे. जर तुम्ही काही चुकीचं केलंच नाहीये, तर मग घाबरण्याचं काय कारण? खरा माणूस कधीच कोणत्या चौकशीला घाबरत नाही. ज्याच्या मनात चोर आहे, तोच घाबरतो. ज्यांची घरं काचेची असतात, ते दुसऱ्यांच्या घरांवर दगड मारत नाही”, असं मोहीत कंबोज भारतीय यांनी आपल्या ट्वीटमध्ये नमूद केलं आहे.

### “सगळी चूक भाजपाची आहे!”

आपल्या ट्वीटमध्ये मोहीत कंबोज यांनी घोटाळ्यांमध्ये सगळी चूक भाजपाचीच आहे, अशा शब्दांत खोचक टोला लगावला आहे. “२००६ मध्ये भाजपानेच रोहीत पवार यांना पीएमसी बँक आणि एचडीआयएल घोटाळ्यातील आरोपी राकेश वाधवान यांचे पार्टनर बनायला भाग पाडलं”, असं देखील मोहीत कंबोज ट्वीटमध्ये खोचकपणे म्हणाले आहेत. “घोटाळे समोर आले तर भाजपाला दोष देतायत”

# “...मग गेल्या अडीच वर्षात महाविकास आघाडीचे नेते भजी तळत होते का?”; राधा कृष्ण विखे पाटलांची खोचक टीका



सातारा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महाविकास आघाडी सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. महाविकास आघाडीमुळेच मराठा आरक्षण गेल्याचा आरोप विखे पाटलांनी केला आहे. किमान समान कार्यक्रमात फक्त वसुलीच झाली बाकी काहीच झाले नाही. महाराष्ट्राने एवढं भ्रष्टाचारी सरकार कधी पाहिलं नव्हतं, अशी टीकाही त्यांनी केली आहे. गेल्या अडीच वर्षात काहीही झालं तरी महाविकास आघाडी सरकारकडून केंद्राकडे बोट दाखवलं जात होतं. मग मविआचे मंत्री काय करत होते भजे तळत होते का? असा खोचक सवालही त्यांनी विचारला आहे.

विकास करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी बोलताना सांगितले. बाळासाहेब थोरातांना टोला

निळवंडे धरणाचं श्रेय हे देवेंद्र फडणवीस यांचंच आहे. त्याचे श्रेय दुसरे कोणीही घेण्याचा प्रयत्न करू नये. उजवा आणि डाव्या कालव्यात पाणी आणल्याशिवाय राहणार नाही म्हणत त्यांनी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांना देखील टोला लगावला आहे. पूर्वी आपण पारंतत्र्यात होतो अशी जनतेची भावना झाली होती. मात्र, आता त्यांना स्वातंत्र्य मिळाल्या सारखे वाटत आहे, असं म्हणत विखे पाटलांनी महाविकास आघाडी सरकारला टोला लगावला आहे.

### वाळू माफियांना इशारा

**विखे पाटलांनी वाळू माफियांना देखील इशारा दिला आहे. वाळू माफीयांचा माज उतरवणून त्यांच्यावर कडक कारवाई करणार, त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नवीन धोरण तयार करणार, असा इशारा यावेळी राधाकृष्ण विखे पाटलांनी दिला आहे. त्यामुळे आता पुढील काळात वाळूच्या तस्करीवर चाप लागण्याची शक्यता आहे.**

# आझाद यांची नवा पक्ष स्थापण्याची तयारी

## 15 दिवसांत जम्मू-काश्मीर शाखा कार्यान्वित



।जम्मू। ।महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

काँग्रेसची तब्बल पन्नास वर्षांची साथ शुक्रवारी सोडल्यानंतर ज्येष्ठ नेते गुलाम नबी आझाद नवीन पक्ष स्थापण्याच्या तयारीत आहेत. येत्या पंधरवड्यात जम्मू-काश्मीरमध्ये या पक्षाची शाखा कार्यान्वित होणार असल्याचे माहिती आझाद यांचे निकटवर्तीय व काँग्रेसचे जम्मू-काश्मीरचे माजी प्रदेश उपाध्यक्ष जी. एम. सरुरी यांनी शनिवारी दिली.

जम्मू-काश्मीरमध्ये ५ ऑगस्ट २०१९ पूर्वीची स्थिती पुन्हा आणणे, हे या नव्या पक्षाचे प्रमुख ध्येय असल्याचे सांगून सरुरी यांनी स्पष्ट केले, की आझाद हे धर्मनिरपेक्षतावादी आहेत. ते भाजपच्या तालावर नाचण्याचा किंवा भाजपची साथ देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आझाद यांच्या राजीनाम्यानंतर जम्मू-काश्मीरच्या शेकडो काँग्रेस नेत्यांनी, पंचायत राज्य सदस्यांनी, प्रमुख कार्यकर्त्यांनी राजीनामा देत काँग्रेसत्याग केल्याचा दावाही सरुरी यांनी केला. ४ सप्टेंबरला आझाद जम्मू येथे येत आहेत. त्या वेळी ते नवीन पक्षाच्या स्थापनेआधी आपल्या समर्थक-शुभचिंतकांशी चर्चा करतील. राजीनामा दिल्यानंतर आझाद यांनी स्वत: नवीन पक्ष स्थापन करणार असल्याची घोषणा केली होती. त्याची जम्मू-काश्मीर शाखा लवकरच कार्यान्वित करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली होती. आझाद यांच्या काँग्रेसत्यागामुळे जम्मू-काश्मीरमधून काँग्रेस जवळपास हद्दपार झाल्याचे सांगून सरुरी यांनी दावा केला, की आझाद यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा देण्यासाठी जम्मू-काश्मीरच्या नेत्यांची रीघ लागली आहे. ग्रामपंचायत सदस्यांसह, जिल्हा आणि गटविकास समिती सदस्य व अनेक नगरसेवकांची शेकडो राजीनामापत्रे आम्हाला प्राप्त झाली आहेत. अनेक माजी मंत्र्यांसह नेत्यांनी-आमदारांनी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत आझाद यांना पाठिंबा दिला आहे.

### ‘काँग्रेसची वास्तवाकडे डोळेझाक!’

**आझाद भाजपशी सहयोग करत असल्याच्या काँग्रेसच्या आरोपाबाबत सरुरी म्हणाले, की आझाद यांच्यावर टीका करणारे एक तर वास्तवाकडे डोळेझाक करत आहेत अथवा आपल्या पायाखालची जमीन सरकत असल्याची जाणीव त्यांना झाली आहे.**

# गणेशोत्सवाच्या धामधुमीत अमित शहा येणार मुंबई दौऱ्यावर

## लालबागच्या राजाचं घेणार दर्शन



मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिंदे फडणवीस सरकार सत्तेत आल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा पहिल्यांदाच मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. ५ सप्टेंबर रोजी गणेशोत्सवाच्या धामधुमीत ते मुंबई दौऱ्यावर असणार आहेत. महत्त्वाचं म्हणजे यावेळी ते नेहमीप्रमाणे लालबागच्या राजाचं दर्शन घेणार आहेत. मुंबई पालिकेसह इतर पालिकांच्या निवडणुकींच्या तोंडावर अमित शहा मुंबई दौऱ्यावर येणार असल्याने त्यांच्या राजकीय भाष्याकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा २०१७ पासून नियमित लालबागच्या राजाचं दर्शन घेण्यासाठी येत असतात. मात्र, कोविडच्या काळात ते मुंबई दौऱ्यावर दर्शनासाठी येऊ शकले नाहीत. दरम्यान, आता निवडणुकीच्या तोंडावर ते मुंबईत येणार आहेत. त्यामुळे त्यांचा हा दौरा निश्चितच राजकीय दौरा ठरणार आहे. या दौऱ्यात अमित शहा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अमित शाह आणि भाजपाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष आशिष शेलार यांच्या घरी गणरायाच्या दर्शनाला जाणार आहेत. त्यानंतर, ते लालबागच्या राजाच्या दर्शनाला जाणार आहेत.

# आलियाच्या कोणत्या चित्रपटाची होणार ऑस्करसाठी निवड?



अभिनेत्री आलीया भट्ट हिने स्वतःच्या अभिनयाच्या जोरावर बॉलिवूड मध्ये स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. आलियाला आत्तापर्यंत वेगवेगळ्या पद्धतीचे आणि वेगवेगळ्या विषयाचे चित्रपट मिळाले. त्या चित्रपटांमध्ये आलिया भट्टने वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या या सगळ्या भूमिकांचे प्रेक्षकांनी कौतुक केले. पण आता आलिया भट्टच्या दोन चित्रपटांना थेट ऑस्करचे नामांकन मिळाले आहे. पण त्या पैकी नेमका कोणता चित्रपट ऑस्कर पुरस्कार पटकावणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. अभिनेत्री आलिया भट्टने तिला जी भूमिका मिळाली त्या भूमिकेला पुरेपूर न्याय दिला आहे. आणि हिंदी चित्रपट सृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# चाहत्याच्या पाया पडतोय हृतिक रोशन; सोशल मीडियावर व्हिडीओ व्हायरल



बॉलिवूडचा लोकप्रिय आणि हँडसम हंक म्हूण हृतिक रोशनला ओळखलं जातं. हृतिक रोशन सध्या त्याच्या आगामी 'विक्रम वेधा या चित्रपटामुळे चर्चेत आहे. दरम्यान, अभिनेता हृतिकचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. शनिवारी हृतिकने रोशनने मुंबईतील एका कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यादरम्यान त्याला तिथे त्याचे अनेक चाहते भेटले. त्यातील एका चाहत्याच्या पायाला स्पर्श करत हृतिकने तिथे असलेल्या सर्वांनाच अश्चर्य चकित केलं. कार्यक्रमादरम्यान हृतिक रोशन(HRITHIK ROSHAN) स्टेजवर येताच त्याच्या एका चाहत्याने हृतिकच्या पायाला स्पर्श केला. पण त्यानंतर क्षणाचाही विलंब न करता हृतिकने ही चाहत्याच्या पायाला स्पर्श केला. हृतिकचा हाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ सेलिब्रिटी फोटोग्राफर विरल भयानीने त्याच्या इंस्टाग्रामवर शेअर केला आहे. अत्यंत स्टायलिश आणि हॅंडसम अभिनेता म्हून हृतिकच्या लूकची नेहमीच चर्चा असते. या कार्यक्रमाच्या वेळीही तो पिवळ्या रंगाचा को-ऑर्डर सेट परिधान केलेला दिसत आहे. हृतिकच्या या लुकची सुद्धा चर्चा होत आहे. हृतिक रोशनचे सोशल मिडिड्यावर अनेक चाहते सुद्धा आहेत. हृतिकचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर झाल्यापासूनच बॉलिवूड कलाकार आणि ताच्या चहात्यांकडून हितिक रोशनवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. हृतिक रोशन लवकरच 'विक्रम वेधा'(VIKRAM VEDHA)या आगामी चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात हृतिकसोबत सैफ अली खानहीसुद्धा झळकणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला असून त्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. तमिळ चित्रपटाचा हिंदी रिमेक याच शीर्षकाने बनला आहे. हिंदी चित्रपटाचे दिग्दर्शनही पुष्कर-गायत्री यांनी केले आहे.

# ‘एका काळेचे मणी’ धमाल वेबसिरीज लवकरच होणार प्रदर्शित

मराठी डिजिटल विश्वात ‘एका काळेचे मणी’ ही एक धमाल वेबसिरीज आणली आहे. एका चित्र-विचित्र फॅमिली ची आगळी वेगळी कहाणी, कधी कधी वाटतात थोडी क्रेझी पण सगळीचं आहेत मात्र फूल टू शहाणी ! यात एका मध्यमवर्गीय मराठी कुटुंबाची हटके, विनोदी कथा आणि पात्र आपल्याला भेटणार आहेत. ज्येष्ठ दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते महेश मांजरेकर यांनी या मालिकेची निर्मिती केली असून या वेबसिरीजचे दिग्दर्शन अतुल केतकर यांनी केले आहे. या मालिकेची संकल्पना ऋषी मनोहर याची असून ओम भूतकर याने याचे लिखाण केले आहे. या मालिकेचे मुख्य आकर्षण म्हणजे मराठी नाटकक्षेत्राचे सुपरस्टार प्रशांत दामले मुख्य भूमिकेत असणार आहेत. त्यांच्याबरोबर हृता दुर्गुळे, वंदना गुप्ते, पौर्णिमा मनोहर, ऋषी मनोहर, रुतुराज शिंदे इत्यादी प्रतिभावान कलाकारांचा समावेश आहे. आणि यातील अजून एक मुख्य आकर्षण म्हणजे सध्याचे कॉमेडीस्टार समीर चौगुले आणि विशाखा सुभेदार देखील यात सहभागी असणार आहेत.





# शाहरुखला लग्नासाठी दुसरी कोणी भेटल्यास काय करशील?

बॉलिवूडचा बादशाह म्हणून ओळखला जाणारा शाहरुख खान इंडस्ट्रीतील सर्वात रोमँटिक अभिनेता म्हणूनही प्रसिद्ध आहे. पण या रोमान्सच्या बादशाहच्या हृदयावर राज्य करणारी राणी दुसरी तिसरी कोणी नसून त्याची पत्नी गौरी खान आहे. वयाच्या १८ व्या वर्षी शाहरुख खान गौरीच्या प्रेमात पडला होता. गौरीच्या प्रेमात तो एवढा बुडाला होता की त्याने तिच्यासाठी हातात पैसे नसतानाही मुंबई गाठली होती. गौरी मुंबईमध्ये कुठे आहे याची काहीच माहिती नसताना त्याने तिला शोधून काढलं होतं. प्रेमात बरेच चढ-उतार पहिल्यानंतर १९९१ मध्ये या दोघांनी लग्न केलं होतं आणि आता हे तीन मुलांचे आई- वडील आहेत. शाहरुख खानची पत्नी गौरी खानने करण जोहरच्या 'कॉफी विथ करण १'मध्ये हजेरी लावली होती. या शोच्या एका सेगमेंटमध्ये गौरी खानने तिच्या जलसीबाबत भाष्य केलं होतं. जेव्हा तिला कोणी शाहरुखला लग्नासाठी दुसरी कोणीतरी भेटल्यास तिची प्रतिक्रिया काय असेल? असा प्रश्न विचारतात तिला काय वाटतं यावर ती बोलली होती. करण जोहरने गौरीला हाच प्रश्न विचारला होता. त्यावर उत्तर देताना गौरी म्हणाली होती, “खरं तर सर्वात आधी मला हा प्रश्न जो कोणी विचारतो त्याचा खूप राग येतो. मी नेहमीच देवाकडे प्रार्थना करते की, जर शाहरुखला अशी कोणी भेटली तर ती माझ्यापेक्षा उत्कृष्ट असावी .

# ‘लायगर’मधील ‘त्या’ डायलॉगमुळे अनन्या पांडे ट्रोल

या चित्रपटामध्ये अनन्याचा असा एक संवाद आहे ज्यामुळे आता तिला ट्रोल केलं जात आहे. पुरी जगन्नाथ यांचं दिगदर्शन असलेला आणि विजय देवरकोंडा आणि अभिनेत्री अनन्या पांडे यांची मुख्य भूमिका असलेला ‘लायगर’ चित्रपट काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झाला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा संमिश्र प्रतिसाद मिळताना दिसत आहे. अशातच सोशल मीडियावरही या चित्रपटावर बरेच मीम्स व्हायरल होताना दिसत आहेत. विशेषतः अभिनेत्री अनन्या पांडे या चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर पुन्हा नेटकऱ्यांच्या निशाण्यावर आहे. तिच्या अभिनयावरून तिला जोरदार ट्रोल केलं जात आहे. या चित्रपटामध्ये अनन्याचा असा एक संवाद आहे ज्यामुळे आता तिला ट्रोल केलं जात आहे.



अनन्या आणि विजय देवरकोंडा यांच्या चित्रपटातील एक सीन सोशल मीडियावर चर्चेत आहे. या सीनचा व्हिडी खूप व्हायरल होताना दिसत असून यात अनन्या अभिनयाच्या करिअरसाठी हॉलिवूडला जाणार असल्याचं बोलताना दिसत आहे. अनन्या म्हणते, “मी एक स्टार आहे आणि माझं करिअर पुढे नेण्यासाठी मी हॉलिवूडला जात आहे.” तिच्या याच संवादाची सोशल मीडियावर जोरदार खिल्ली उडवली जात आहे. अनन्याच्या या सीनचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत असून यावरून नेटकरी अनन्याला ट्रोल करताना दिसत आहेत. एका युजरने तिचा हा व्हिडीओ शेअर करताना लिहिलं, “खरंच की काय? आधी बॉलिवूड करिअर तरी सांभाळ, नीट अभिनय तरी कर ताई.” याशिवाय अन्य एका युजरने लिहिलं, “मला अद्याप हसू आवरत नाहीये. आता आम्हाला, स्कार्लेट जॉहनसन, ऐमा वॉटसन यांच्याशी अनन्याची तुलना करावी लागणार का?” तर आणखी एकाने लिहिलं, “मला कळत नाही लेखकाने अशाप्रकारचा संवाद हिच्यासाठी लिहिलाच कसा?” दरम्यान ‘लायगर’मध्ये अनन्या पांडे एका सोशल मीडिया एन्फ्लुएन्सरच्या भूमिकेत आहे. तिला अभिनय क्षेत्रात करिअर करायचं आहे आणि विजय देवरकोंडा एक बॉक्सर असून तो तिच्या प्रेमात पडतो. या दोघांमध्ये एक सीन आहे. या सीनमध्ये दोघंही भर रस्त्यात एकमेकांशी भांडताना दिसत आहे. याच भांडणात अनन्या विजयला म्हणते, “मी एक स्टार आहे आणि मला माझ्या अभिनयाच्या करिअरसाठी हॉलिवूडला जायचं आहे.”

## शॉर्ट न्यूज »

### जागतिक बॅडिमटन स्पर्धा सात्विक-चिरागला कांस्य ;

**टोक्यो । महाईन्यूज**

सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय बॅडिमटन जोडीची जागतिक स्पर्धेतील वाटचाल उपांत्य फेरीत संपुष्टात आली. सात्विक-चिराग यानंतरही जागतिक स्पर्धेत कांस्यपदकाचे मानकरी ठरले. जागतिक स्पर्धेत पुरुष दुहेरीतील हे पहिलेच पदक ठरले. उपांत्य फेरीत सात्विक-चिरागला मलेशियाच्या अ‍ॅरॉन शिआ-सोह वूई यिक जोडीकडून शनिवारी चुरशीच्या लढतीत पराभवाचा सामना करावा लागला.जागतिक क्रमवारीत सात्विक-चिराग सातव्या स्थानावर आहेत. राष्ट्रकुल स्पर्धेतील सुवर्णपदकाची कमाई करणाऱ्या सात्विक-चिरागला उपांत्य फेरीत २२-२०, १८-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला. ऑलिम्पिक स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या मलेशियाच्या जोडीने ७७ मिनिटांच्या लढतीनंतर विजय मिळवला. जागतिक क्रमवारीतील सहाव्या स्थानावरील जोडीकडून सात्विक-चिरागला सलग सहाव्या लढतीत पराभव पत्करावा लागला.

# भारत-पाक लढतीआधी क्रिकेट चाहत्यांना मोठा धक्का!

## भारताच्या धडाकेबाज खेळाडू राहुल शर्माने घेतली निवृत्ती

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**



सध्या आशिया चषक स्पर्धेची सगळीकडे धूम असून आजच्या भारत-पाकिस्तान सामन्यात कोणाचा विजय होणार याची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहलीसाठीदेखील आजचा सामना खास ठरणार आहे, कारण तो आपला १०० वा टी-२० क्रिकेट सामना खेळतोय. दरम्यान, एकीकडे भारत-पाक सामन्याची सर्वांना उत्सुकता लागलेली असताना भारतीय क्रिकेट चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. भारताचा वेगवान गोलंदाज राहुल शर्मा याने क्रिकेटच्या सर्व प्रकारातून निवृत्त होत असल्याचं जाहीर केलंय. यापूर्वी त्याने आयपीएल क्रिकेटमध्ये धमाकेदार कामगिरी केलेली आहे. राहुल शर्मा आपल्या करिअरमध्ये आयपीएलमध्ये वेगवेगळ्या संघांकडून खेळून दिमाखदार कामगिरी केलेली आहे. आयपीएलसोबतच त्याने भारतीय क्रिकेट संघाचेदेखील प्रतिनिधित्व केलेले आहे. त्याने चार आंतरराष्ट्रीय एकदिवसीय तसेच दोन टी-२० सामन्यात भारतीय संघासाठी गोलंदाजी केली. मात्र करिअरला निश्चित दिशा मिळालेली असताना त्याच्यावर ड्रग्ज सेवनाचे आरोप करण्यात आले. परिणामी निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी त्याला बराच काळ झगडावे लागले. ऐन उमेदीच्या काळात त्याला भारतीय क्रिकेट संघातील स्थान गमवावे लागले. राहुल शर्माने आयपीएल क्रिकेटमध्ये २०१० साली पदार्पण केले. या हंगामात त्याने डेक्कन चार्जर्स संघाचे प्रतिनिधीत्व केले. त्यानंतर २०११ च्या हंगामात तो पुणे वॉरिअर्स संघाकडून खेळला. या हंगामात त्याने एकूण १६ विकेट्स घेऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यानंतर त्याला भारतीय संघातही स्थान देण्यात आले. २०१४ सालच्या आयपीएल हंगामात तो दिल्ली डेअरडेव्हिल्स संघाकडून खेळला. त्यानंतर २०१५ साली त्याला चेन्नई सुपर किंग्ज संघाने खरेदी केले होते.

### डायमंड लीग अ‍ॅथलेटिक्स स्पर्धा

# नीरजला ऐतिहासिक सुवर्ण!

### डायमंड लीग स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्र




**। लुसाने। महाईन्यूज ।**

ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राने शुक्रवारी आणखी एक ऐतिहासिक यश मिळवले. डायमंड लीग मालिकेतील अखेरच्या स्पर्धेत त्याने ८९.०८ मीटर भालाफेक करताना सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीमुळे नीरज डायमंड लीगच्या अंतिम फेरीसाठी पात्र ठरला.

डायमंड लीग स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारा नीरज हा पहिला भारतीय खेळाडू ठरला. स्नायूच्या दुखापतीमुळे नीरजने राष्ट्रकुल स्पर्धेतून माघार घेतली होती. या कालावधीत मिळालेल्या विश्रांतीने नीरज डायमंड लीगच्या अखेरच्या स्पर्धेसाठी ताजातवाना राहिला. पहिल्याच प्रयत्नात त्याने ८९.०८ मीटर भालाफेक करताना सुवर्णपदक निश्चित केले. नीरजच्या कारकिर्दीमधील ही तिसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च कामगिरी ठरली. दुसऱ्या प्रयत्नात त्याने ८५.१८ मीटर अंतर गाठले. नीरजने तिसरा प्रयत्न केला नाही. चौथ्या प्रयत्नाला त्याच्याकडून चूक झाली. नीरजने पाचवा प्रयत्न केला नाही. अखेरच्या सहाव्या प्रयत्नात त्याने ८०.०४ मीटर भालाफेक केली.

टोक्यो ऑलिम्पिक स्पर्धेतील रौप्यपदक विजेत्या जेकहब वॅडलेशने ८५.८८ मीटर भालाफेक करून दुसरा क्रमांक मिळवला. अमेरिकेच्या कर्टिस थॉम्प्सनने (८३.७२ मीटर) कांस्यपदक मिळवले. डायमंड लीग मालिकेतील दुसऱ्या टप्प्यातील स्पर्धेनंतर नीरज दुसऱ्या स्थानावर होता.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
96577 67000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही